सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४२३/६७, ई-मेल—desk3@dtemaharashtra.gov.in,
वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा क्र. १८/तंशिसं/EBC/२०२४/४८ दिनांक: ०२/०२/२०२४

**महत्वाचे:**

प्रती,

(१) राज्यातील सर्व व्यावसायीक संस्थांचे मा. अध्यक्ष/ सचिव

(२) राज्यातील सर्व व्यावसायीक संस्थांचे प्राचार्य

**विषय: राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजनाची (EBC) प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत..**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजने अंतर्गत (EBC) राज्यातील आर्थिक दृष्टीने मागास वर्गातील विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. या योजनेचा लाभ मिळविण्याकरिता १० ऑक्टोबर २०२३ पासून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेशीत विद्यार्थ्यांकरिता डीबीटी पोर्टल द्वारे अर्ज स्वीकृती सुरु करण्यात आलेली आहे. गेल्या तिन महिन्यांपासून या योजने अंतर्गत आजतागायत संपूर्ण राज्यातून अपेक्षित २.६० लक्ष विद्यार्थ्यांपैकी फक्त १.५९ लक्ष विद्यार्थ्यांनी नोंदणी केल्याचे निदर्शनास आलेले आहे.

संचालक, तंत्र शिक्षण यांनी विभागीय सहसंचालक यांचे सोबत मागील दोन महिन्यात वेळोवेळी बैठका घेवून सदर योजनेचा आढावा घेतला असता या योजनेचा लाभ घेणे बाबतची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे किंवा विद्यार्थ्यांकडून नोंदणी करून घेण्यास संस्थास्तरावर उदासीनता दिसून येत असून संस्थांकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी या योजनेचा आढावा घेतला. या योजनेचा लाभ मिळविण्याकरिता विद्यार्थ्यांची नोंदणी अत्यंत कमी प्रमाणात व अत्यंत संथ गतीने होत असून संस्थेमार्फत या करिता कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही, पर्यायाने या आर्थिक वर्षात ३१ मार्च २०२४ पूर्वी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्याबाबतीत अडचणी येवू शकतात असे मत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी व्यक्त केले, तसेच याबाबत राज्यातील सर्व संस्थाचालक व प्राचार्य यांना तात्काळ आवश्यक कार्यवाही करणेबाबत कळविण्याचे निर्देश संचालनालयास दिलेले आहेत.

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे अध्यक्षतेखाली व मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे उपस्थितीत दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी राजभवनात JBVC ची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी आर्थिक वर्ष २३-२४ करिता सर्व शिष्यवृत्ती योजनांना आवश्यक निधी उपलब्ध पूर्णपणे उपलब्ध करण्यात आलेला आहे असे नमूद केले व सर्व निधी याच आर्थिक वर्षात ३१ मार्च २०२४ पूर्वी खर्च करण्यात यावा असे निर्देशित केले.

वरील सर्व बाबीं लक्षात घेवून राज्यातील सर्व संस्थांचालक व प्राचार्यांना असे निर्देशित करण्यात येते की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजने अंतर्गत (EBC) आपापल्या संस्थेतील सर्व पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांची या योजने अंतर्गत **दि. १५ फेब्रुवारी २०२४ पूर्वी** नोंदणी करण्यात यावी तसेच या सर्व अर्जांची लगेच छानणी करून विभागीय कार्यालयाकरिता पुढील मान्यतेसाठी डीबीटी पोर्टल वर उपलब्ध करून देण्यात यावे. या आर्थिक वर्षात सदर योजनेच्या लाभापासून कोणताही पात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास व दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत नोंदणी व छानणी अभावी पात्र विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती प्राप्त न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांचालक व प्राचार्य यांची असेल याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

प्रत माहितीकरिता:

(१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत योग्य कार्यवाहिकरिता:

(२) सर्व सहसंचालक, विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, मुंबई, नागपूर, पुणे